महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ८२ /२०२३ दि. ३०/०५/२०२३

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना

**संदर्भ :–** १) क्र.एमव्हीआर–०५२३/प्र.क्र.१२०/परि–२ गृह (परिवहन) विभाग दुसरा मजला मंत्रालय, मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक दिनांक ३०/०५/२०२३

*******

**ज्याअर्थी**, तिथी प्रमाणे जेष्ठ शुद्ध त्रयोदशी दिनांक ०२/०६/२०२३ व तारखेप्रमाणे, दिनांक ०६/०६/२०२३ रोजी ३५० वा. श्री.शिवराज्याभिषेक सोहळा किल्ले रायगड येथे साजरा करण्यात येणार असल्याने सदर ठिकाणी कार्यक्रमाकरिता लाखोंच्या संख्येने शिवभक्त तसेच शिवप्रेमी नागरिक रायगड, पुणे, कोल्हापुर, सातारा, मुंबई या ठिकाणी आपापली वाहने घेवुन उपस्थित राहणार आहेत.

२) ज्याअर्थी, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र ६६ वर रस्ता चौपदरीकरणाचे काम सुरू असल्यामुळे ब–याच ठिकाणी बोटलनेक पॉईंट तयार झालेले आहेत. सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने नमुद मार्गावर जड अवजड वाहनांची वाहतुक सुरू राहिल्यास वाहतुक कोंडीचा प्रश्न निर्माण होवु शकतो या करिता महाराष्ट्र शासनाकडुन वरिल संदर्भ क्रमांक ०१ अन्वये मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र ६६ वर जड अवजड वाहनांची वाहतुक ठराविक दिनांक व वेळेकरिता बंद करण्यात आलेली आहे.

३) ज्याअर्थी, ठाणे शहराकडुन नवी–मुंबई मार्गे मुंबई –गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र ६६ वर जड अवजड वाहने जावुन वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही याकरिता सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चीत राहण्यासाठी आम जनतेच्या सोयीसाठी अधिसुचना काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

४) त्याअर्थी, मी मंदार धर्माधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण वाहतुक विभाग अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग ठाणे शहर, महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करित आहे.

**प्रवेश बंद –** ठाणे शहराकडुन नवी मुंबई मार्गे जाणा–या जड अवजड वाहनांना मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र ६६कडे जाण्यास दिनांक ३१/०५/२०२३ रोजी २४:०० वाजल्यापासुन ते दिनांक ०२/०६/२०२३ रोजी २४:०० वाजेपर्यंत व दिनांक ०४/०६/२०२३ रोजी २४:०० वाजल्यापासुन ते दिनांक ०६/०६/२०२३ रोजी २४:०० वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक अधिसुचना अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**( मंदार धर्माधिकारी )**
सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण वाहतुक विभाग
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग ठाणे शहर,

CamScanner

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.

२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना रद्द केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा.सविनय सादर**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे व नवी मुंबई.
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा,ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३ कल्याण, परिमंडळ –४ उल्हासनगर

**प्रत** :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना रद्द करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner